नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/१०/२०२५ (शनिवार )**

---

## अवघ्या ५ तासात दरोडयाचा गुन्हा उघड
## ५ आरोपी अटक
## काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक १८/१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन काटोल येथे फिर्यादी जय रामदास राकस ,रा. सारवाडी, ता. कारंजा जि. वर्धा यांनी पो.स्टे. ला येवुन रिपोर्ट दिली की, दिनांक १७/१०/२०२५ रोजी फिर्यादी  हा त्याचे मित्र—मैत्रिनी सोबत मौजा रिधोरा डॅम येथे फिरायला गेला असता तिथे दोन मोटरसायकलवर ०५ अनोळखी व्यक्ती आले त्यांनी फिर्यादी आणि त्याच्या मित्रमैत्रिणींना डॅमच्या पाण्यात फेकुन देवु असे धमकावुन धक्का बुक्की आणि दमदाटी करून फिर्यादी आणि त्याचे मित्रमैत्रिणीकडील २ अॅड्रॉईड मोबाईल किंमती २७,५०० /— रूपये व नगदी १,०००/— रूपये असा एकुण २८,५००/— रूपयांचा मुद्देमाल जबरीने हिसकावुन नेल्याचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन काटोल येथे ५ अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३१०(२),(५),११५(२),३५१ (२) अन्वये दरोडयाचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयांचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांनी सदर गुन्हयाचा तात्काळ सुरू करत गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे  दिनांक १८/१०/२०२५ आरोपी १) दिनेश तेजराम मारवाडी, वय ३१ वर्ष ,२) सुर्यवंशी राजा राजपुत, वय २० वर्ष ,३) जयकिशन जितेंद्र पवार, वय २५ वर्षे, ४) शुभम मनोज पवार, वय १९ वर्षे, आणि ५) जिवन मदन पवार, वय ३० वर्षे, सर्व रा डोंगरगाव, ता.काटोल

यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हयांची केल्याची कबुली दिली. नमुद पाचही गुन्हेगार हे अभिलेखावरील गुन्हेगार असुन त्यांचेवर चोरी,दुखापत आणि अवैध दारू विक्रीचे गुन्हे नोंद आहे. **नमुद आरोपीतांना काटोल पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद, ६१ लाख ८ हजारांचा मुद्देमाल जप्त
## रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक:—** दिनांक १८/१०/२०२५ रोजी रामटेक पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सतर्कपणे पेट्रोलींग करून मौजा सलाईमेटा ते भंडारबोडी रोडवर पाहटे ०४:३० वाजता संशयीत टिप्पर क्रमांक एम.एच. ४० सि.टी १८१९ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **चालक आरोपी क्रं १) शुभम सुधाकर पुडके, वय २५ वर्षे, रा. किरणापुर ता.रामटेक, जि नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव आरोपी क्रं **२) सतिष चिंधुजी बावणे, रा. खापा ता.तुमसर जि.भंडारा** याचे सांगण्यावरून आरोपी क्रं १) हा अवैधरित्या रेतीची वाहतुक करत असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक एम.एच. एम.एच. ४० सि.टी १८१९ किमती ३०,००,००० /— रूपये व २) ९ ब्रास रेती किंमती ५४,०००/— रूपये आणि असा एकुण ३०,५४,०००/रूपयेचा माल जप्त केला. त्यानंतर पेट्रोलींग दरम्यान तुमसर मनसर रोड वरील मौजा भंडारबोडी बस स्टॉप येथे सुमारे ०५:३० वाजता संशयीत टिप्पर क्रमांक एम.एच. ४९ सि.एफ ७४७४ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालक आरोपी क्रं **१) संजय केशवराव फुकटकर, वय ४१ वर्षे, रा. निलज बु.,ता. मोहाडी, जि नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव आरोपी क्रं **२) आसिफ खान इस्माईल खान पठाण ,रा. युसुफ किरणा दुकानाजवळ,आझाद कॉलनी, निराला सोसायटी, अयोध्या नगर, नागपुर** याचे सांगण्यावरून आरोपी क्रं १) हा अवैधरित्या रेतीची वाहतुक करत असल्याची माहीती प्राप्त झाली .

पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक एम.एच. ४९ सि.एफ ७४७४ किमती ३०,००,००० /—रूपये व २) ९ ब्रास रेती किंमती ५४,०००/— रूपये आणि असा एकुण ३०,५४,०००/— रूपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही कारवाईत एकुण ६१,०८,०००/— रूपयांचा माल जप्त करण्यात आला आहे**

**नमुद ट्रक चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आला आहे. तीन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**






## कुही पोलीस स्टेशन हद्‌दीतील अवैध दारू विक्री करणारे २ आरोपीतांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब)  अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांनी  तुलाराम तुळशीराम चाचरकर, वय ५२ वर्षे, रा.  कुही ,जि नागपुर  याला ४ महीन्यांकरीता आणि जिवन गौतम बन्सोड, वय २९ वर्षे, रा मांढळ ता कुही याला  ५ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

नमुद दोन्ही आरोपीतांवर पोलीस स्टेशन कुही येथे अवैध दारू विक्रीचे अनेक गुन्हे दाखल असुन नमुद आरोपी हे असे गुन्हे करण्याचे सवयीचे आहे. त्याचे गुन्हेगारी

कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी आरोपीतांवर गुन्हे नोंद करून त्यांच्यावर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी क्रं १) **तुलाराम तुळशीराम चाचरकर, आणि क्रं २) जिवन गौतम बन्सोड यांनी** आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचे असल्याने त्यांच्या अशा प्रकारचे गुन्हेगारी कृत्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव कुही पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून दिनांक १७/१०/२०२५ रोजी आरोपी नामे तुलाराम तुळशीराम चाचरकर, वय ५२ वर्षे, रा. कुही ,जि नागपुर याला ४ महिन्यांकरीता आणि जिवन गौतम बन्सोड, वय २९ वर्षे, रा मांढळ ता कुही याला ५ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केल्याचा आदेश पारीत केला आहे. **तसेच मांढळ येथील दारू विक्रता आरोपी नामे आशिष उर्फ सुरेश पिल्लेवान हा त्याचे जुने राहते घरातुन दारू विक्री करतो आणि दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देतो. त्याचेवर वेळोवेळी पोलीसांनी कारवाई करून गुन्हे नोंद केले असुन प्रतिबंधात्मक कारवाई सुध्दा केली आहे. परंतु त्यांचे गुन्हेगारी कृत्य सुरूच असल्याने तो दारू पिण्यासाठी उपलब्ध करून देत असलेली जागा सिल करण्याबाबत प्रस्ताव कुही पोलीसांकडुन उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविण्यात येणार आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



तुलाराम   तुळशीराम  चाचरकर



जिवन  गौतम  बन्सोड

## उमरेड पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू विक्रेता गुन्हेगार केवलराम देवाजी दिघोरे याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांनी केवलराम देवाजी दिघोरे, वय ५० वर्षे, रा. तारणा ता. कुही ,जि नागपुर याला ६ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

नमुद आरोपीवर पोलीस स्टेशन उमरेड येथे अवैध दारूचे अनेक गुन्हे दाखल असुन नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याचे सवयीचा आहे. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी आरोपीवर गुन्हे नोंद करून त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी नामे **केवलराम देवाजी दिघोरे,** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हेगारी कृत्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा **महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव उमरेड पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून दिनांक १७/१०/२०२५ रोजी आरोपी नामे केवलराम देवाजी दिघोरे, वय ५० वर्षे, रा. तारणा ता. कुही ,जि नागपुर याला ६ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केल्याचा आदेश पारीत केला आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**केवलराम देवाजी दिघोरे**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक १८/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी जे.डी. इंजिनियरींग कॉलेज, बोरगाव येथील विदयार्थ्यींना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली. **पोलीस स्टेशन पारशिवणी** अंतर्गत सहा पोलीस निरीक्षक श्रीमती धनश्री कुटेमाटे यांनी हरीहर कॉलेज पारशिवणी, रमाई कॉलेज, नयाकुंड आणि जिल्हा परिषद नयाकुंड येथे जावुन सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,

१. अनोळखी मोबाईल क्रमांकावर आलेले व्हिडीओ कॉल उचलु नका. सायबर गुन्हेगार अश्लिल व्हिडीओ दाखवुन रेकॉर्डीग करून तुम्हाला ब्लॅकमेल करतात.

२. **Wedding Invitation card .apk, PM kisan .apk, ADHAR CARD Update . apk** या प्रकारचे ईतर **apk** फाईल्स वर क्लिक करू नये तसेच शेयर करू नये आपला मोबाईल हॅक होवु शकतो.

सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी **www.cybercrime.gov.in** या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक **1930 , 1945** यावर तक्रार नोंदवा.






## अवघ्या ०२ तासात मोबाईल चोरीच गुन्हा उघड
## एमआयडीसी बुटीबोरीपोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे दि. १८/१०/२०२५ रोजी फिर्यादी रूषीकेश राजेद्र इंगोले, वय २५ वर्षे, रा. वृंदावन अपार्टमेन्ट नॅशनल कैंसर हॉस्पीटल जवळ, एमआयडीसी, व्यवसाय—मॅनेजर (फ्लीपकार्ट कंपनी) यांनी फिर्याद दिली की, दि. ०९/१०/२०२५ रोजी सकाळी १०/०० वा ते रात्री २०/०० वा दरम्यान कंपनीच्या ऑफीसला शिपमेन्ट मध्ये आलेल्या मोबाईल पैकी ०४ नग वेगवेगळया कंपनीचे मोबाईल फोन किंमती ५०,१००/—रूपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३०३(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

एमआयडीसी बोरी पोलीसांनी तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदार यांच्या मदतीने तपास करीत अवघ्या ०२ तासात एमआयडीसी कंपनी परीसरातून फ्लीपकार्ट कंपनीत काम करणारा आरोपी योगेश मारूती लिचडे यास ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. नमुद आरोपीचे ताब्यातुन चोरीस गेलेले ०४ नग मोबाईल फोन किंमत ५०,१००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६२७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १८/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६२७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३१ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २० आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे २६ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९ आरोपी अशा एकुण ६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २६ आरोपी अशा एकुण १०६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३० आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने